मुद्रांक शुल्क ₹ ५३,४००/-
नोंदणी फी ₹ ८,९००/-

# अभिहस्तांतरण पत्र

## (विक्रीपत्र)

मौजा - वानाडोंगरी येथील अकृषक खसरा क्र. १६ व १८ मध्ये ''महालक्ष्मी नगर'' या नावाने आखलेल्या अभिन्यासातील भुखंड क्र. २३

**मुळ किंमत ₹ ८,९०,०००/-**

**बाजारभाव किंमत ₹ ५,३७,०००/-**

**दर ₹ १०,६६०/- प्रति चौरस मिटर**

**विभाग क्र. १.१**

STAMPS AFFIXED HERE :

<u>**लिहून घेणार**</u> : **श्री. हरिलाल पन्नालाल शर्मा**
**(पक्ष क्र. १)**

जन्म तारीख : ............., वय अं. ४१ वर्षे,
व्यवसाय - व्यापार
राहणार - शिव मंदिर जवळ, राजीव नगर,
वानाडोंगरी, तह. हिंगणा, जि. नागपूर - ४४१ ११०.
(स्थाई लेखा संख्या - FXLPS 0755 P)
(आधार क्रमांक - 3150 1273 7469)
(भ्रमणध्वनी क्रमांक - 88 060 84378)

यापुढे भुखंड खरेदीदार/लिहून घेणार यांना **'पक्ष क्र. १'** म्हणुन संबोधण्यात येईल.

<u>**लिहून देणार**</u> : **श्री. समिर श्यामराव कडव**
**(पक्ष क्र. २)**

जन्म तारीख : ३०/०७/१९७२, वय अं. ५४ वर्षे,
व्यवसाय - व्यापार
राहणार - ५८-५९, डोंगरे लेआऊट,
श्रध्दानंदपेठ, अभ्यंकर नगर, नागपूर - ४४० ०१०.
(स्थाई लेखा संख्या - AFZPK 6645 M)
(आधार क्रमांक - 2989 6478 9182)
(भ्रमणध्वनी क्रमांक - 94 228 02474)

यापुढे भुखंड विक्रेता/लिहून देणार यांना **'पक्ष क्र. २'** म्हणुन संबोधण्यात येईल.

(या पूढील लेखात लिहून घेणार (भुखंड खरेदीदार/पक्ष क्र. १) व लिहून देणार (विक्रेता/विकासक/पक्ष क्र.२) या अर्थाच्या शब्दात पूर्व संदर्भ विरुद्ध नसल्यास त्याचे प्रत्येकी वारस, वहिवाटदार, कायदेशीर हक्कदार, इस्टेटीचे प्रतिपालक, आममुखत्यार धारक/धारणा किंवा ज्यांना या प्रकल्पातून व स्थावर मालमत्तेपासून फायदा मिळेल असे सर्व अंतर्भूत समजण्यांत येतील. तसेच या पुढील संदर्भात ज्या ठिकाणी एक वचनी उल्लेख येईल, त्या ठिकाणी अनेक वचनी अथवा उलटपक्षी ज्या ठिकाणी अनेक वचनी शब्दार्थात एक वचनी अध्याहत समजण्यात येईल).

**आज दिनांक ...../०८/२०२६ रोजी मा. सह दुय्यम निबंधक साहेब, हिंगणा / नागपूर यांचे समक्ष हे विक्रीपत्र लिहून देण्यात येत आहे कि, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील स्थावर मालमत्ता ही पक्ष क्र. २ यांची स्वअर्जीत असून पक्ष क्र. २ यांच्या एकमेव मालकी, कब्जात, वापरी व वहिवाटीत आहे. तसेच, पक्ष क्र. २ यांच्या नांवे शासकीय-निमशासकीय अभिलेखावर दर्ज असून**

STAMPS AFFIXED HERE :

सदर्हू मालमत्तेवर पक्ष क्र. २ यांच्या शिवाय अन्य कुणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क व संबंध नाही. म्हणून, सदर्हू मालमत्ता विकसीत करण्याचा, अभिन्यास आखण्याचा, अभिन्यासातील भुखंड ईच्छुक खरेदीदार (पक्ष क्र. १) यांना विकण्याचा, विक्रीपत्र निष्पादित करुन पंजीबद्ध करण्याचा पक्ष क्र. २ यांना पूर्णतः कायदेशिर अधिकार आहे.

## परिशिष्ठ क्र. १ मधील स्थावर मालमत्तेचा पुर्व इतिहास

खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील भुमापन क्र. १६ व १८ ची संपुर्ण आराजी ही अगोदर श्री. संदिप घनश्याम चौधरी यांची स्वअर्जीत होती, तसे त्यांचे नांव शासकीय-निमशासकीय अभिलेखावर दर्ज आहे.

तद्पश्चात, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील भुमापन क्र. १८ ची संपुर्ण आराजी ही पक्ष क्र. २ यांनी श्री. संदिप घनश्याम चौधरी यांचेकडून दिनांक ०३/०५/२०१६ रोजी पंजीबद्ध विक्रीपत्रान्वये खरेदी केली असून सदर विक्रीपत्र हे मा. सह दुय्यम निबंधक, हिंगणा यांचे समक्ष १ नंबर बुकाचे १९३६/२०१६ नंबरी नोंदल्या गेले आहे.

त्याचप्रमाणे, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील भुमापन क्र. १६ ची संपुर्ण आराजी ही पक्ष क्र. २ यांनी श्री. संदिप घनश्याम चौधरी यांचेकडून दिनांक ०३/०५/२०१६ रोजी पंजीबद्ध विक्रीपत्रान्वये खरेदी केली असून सदर विक्रीपत्र हे मा. सह दुय्यम निबंधक, हिंगणा यांचे समक्ष १ नंबर बुकाचे १९४५/२०१६ नंबरी नोंदल्या गेले आहे.

तेव्हापासून, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील संपुर्ण आराजी ही पक्ष क्र. २ यांच्या एकमेव मालकी, कब्जात, वापरी व वहिवाटीत असून त्यांच्या नावे शासकिय, निमशासकिय अभिलेखावर दर्ज आहे. म्हणून, सदर्हू मालमत्ता विकसीत करण्याचा, प्रकल्प उभा करण्याचा, अभिन्यास आखण्याचा, अभिन्यासातील भुखंड ईच्छुक खरेदीदार (पक्ष क्र. १) यांना विकण्याचा, विक्रीपत्र निष्पादित करुन पंजीबद्ध करण्याचा पक्ष क्र. २ यांना पूर्णतः कायदेशिर अधिकार आहे.

तद्पश्चात, पक्ष क्र. २ यांनी खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील स्थावर मालमत्ता ही अकृषक करुन अभिन्यास आखण्याचा व विकास करण्याचे ठरविले.

STAMPS AFFIXED HERE :

तसेच, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील स्थावर मालमत्ता ही नगर परिषद, वानाडोंगरी, तह. हिंगणा, जि. नागपूर यांचेकडील महाराष्ट्र गुंठेवारी विकास योजने अंतर्गत समाविष्ठ असून सदर अभिन्यासाचे मुख्याधिकारी, नगर परिषद, वानाडोंगरी यांनी (नियमाधीन करणे, श्रेणीवाड व नियंत्रण) (सुधारित) अधिनियम २०२१ अन्वये अभिन्यास/लेआऊट ला दिनांक २९/०५/२०२४ रोजी जा.क्र./नपवा/न.र.वि./अ.भु. नियमी/१२७९/२०२४ अन्वये अंतिम अभिन्यास नियमितीकरण करणे, करिता नियम, अटी व शर्तींच्या अधीन राहून निवासी उपयोगाकरिता अभिन्यास अंतिम मंजुरी आदेश दिला.

तसेच, सदर नियमितीकरण पत्रान्वये खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील भुमापन क्र. १६ व १८ ची संपुर्ण आराजी १.७० हे.आर. (१७००० चौ.मी.) मध्ये भुखंड क्र. १, १-ए, १-बी, २ ते ६२ असे एकूण ६४ भुखंड नियमित व मंजुर करण्यात आले व या सर्व भुखंडांची एकूण आराजी १०६१७.६९३ चौ.मी., अभिन्यासातील अंतर्गत रोडकरिता आराजी ३२०१.८४ चौ.मी. व अभिन्यासातील खुल्या जागेकरिता आराजी १२७५.२६ चौ.मी. क्षेत्र निर्धारित करुन दिलेले आहे.

तसेच, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील स्थावर मालमत्ता ही महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२-ब अन्वये अकृषक आकारणी करण्याबाबत परवानगी दिलेली आहे, म्हणून, मा. तहसिलदार साहेब, हिंगणा यांनी दिनांक ११/१२/२०२३ रोजी रामाक्र - २८/एन.ए.पी.-३४/प्रस्तु-१/२०२३-२०२४, मौजा-वानाडोंगरी, त.सा.क्र. ४६, तह. हिंगणा अन्वये पारित केलेल्या आदेशान्वये निवासी उपयोगाकरिता अकृषक घोषित केलेली आहे.

तसेच, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील स्थावर मालमत्तेमध्ये आखलेल्या अभिन्यासातील ६४ भुखंडाकरिता गांव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक) अन्वये प्रत्येक भुखंडाकरिता स्वतंत्र भुमापन क्रमांक व उपविभाग निश्चीत करुन स्वतंत्र ७/१२ उतारा जारी केलेला आहे.

तसेच, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील संपुर्ण आराजी मध्ये आखलेल्या अभिन्यासातील सदर विक्रीपत्रान्वये विक्री होत असलेल्या भुखंडाचे सविस्तर वर्णन **'परिशिष्ठ क्र. २'** मध्ये करण्यात आले आहे.

STAMPS AFFIXED HERE :

तसेच, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील संपुर्ण आराजी मध्ये पक्ष क्र. २ यांनी अभिन्यास आखले असून आखलेल्या अभिन्यासाला / प्रकल्पाला **''महालक्ष्मी नगर''** हे नांव दिलेले आहे.

तसेच, खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. १ मधील स्थावर मालमत्ता ही संपुर्णत: पक्ष क्र. २ यांच्या एकमेव मालकीची असून पक्ष क्र. २ यांच्या संपुर्णपणे कब्ज्यात आहे व तसेच, या मालमत्तेच्या मालकी हक्क, कब्जा/ताबा व इतर बाबत कुठल्याही प्रकारचा कुणाचाही दावा, उजर, आक्षेप, तक्रार नाही, अशी पक्ष क्र. २ हे हमी देत आहेत.

तसेच, **''महालक्ष्मी नगर''** या प्रकल्पात पक्ष क्र. १ हे पक्ष क्र. २ यांचेकडून भुखंड विकत घेण्यास ईच्छुक होते, म्हणून, पक्ष क्र. १ यांनी **''महालक्ष्मी नगर''** या प्रकल्पाचे मालकी हक्काचे दस्तावेज, पक्ष क्र. २ यांचा मालकी हक्क, कब्जा-ताबा व इतर सर्व दस्तांची शहानिशा करुन सदर दस्तान्वये विक्री होत असलेला भुखंड पक्ष क्र. २ यांचेकडून नेहमी व वंशपरंपरेकरिता विकत घेण्याचे ठरविले.

म्हणून, पक्ष क्र. २ हे खालील वर्णनीत परिशिष्ठ क्र. २ मधील **भुखंड क्र. २३**, (तसेच, परिशिष्ठ क्र. २ मधील नमुद भुखंड यास या पुढे **'सदर भुखंड'** म्हणून संबोधण्यात येईल.) हा एकूण मोबदला किंमत ₹ **८,९०,०००/-** मध्ये त्यांना प्राप्त त्या संपुर्ण मालकी हक्क व अधिकारास आपल्या सर्व ईस्टेट वारसदार यांच्या खुल्या सहमतीने पक्ष क्र. १ यांना संपूर्ण मालकी, वापरी व वहिवाटीचे हक्कासह कुल मालकी हक्काने नेहमी व वंशपरंपरेकरिता विकत आहे, म्हणून पक्ष क्र. १ व २ हे सदर विक्रीपत्र आज रोजी निष्पादित व पंजीबद्ध करीत आहे.

तसेच, सदर भुखंड हा पक्ष क्र. १ यांना सदर दस्तान्वये उपरोक्त मोबदला रकमेच्या मोबदल्यात विकण्याकरिता पक्ष क्र. २ यांचे सर्व ईस्टेट वारसदार यांची पुर्णपणे खुली सहमती आहे व त्यांचे कोणतेही वारसदार भविष्यात या सदर भुखंडाच्या मालकी हक्काबाबत, मोबदला रकमेबाबत, कब्जा/ताबा बाबात किंवा इतर कोणत्याही बाबतीत कुठल्याही प्रकारचा कोणताही दावा, उजर, आक्षेप, पोलिस तक्रार पेश करणार नाही व असे काही केल्यास त्याचे निवारण पक्ष क्र. २ हे आपल्या नांवे असलेल्या इतर उर्वरित स्थावर-अस्थावर मालमत्तेतून करुन देतील, पक्ष क्र. १ यांना कुठल्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होऊ देणार नाही, अशी पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांना सदर लेखान्वये लेखी हमी देत आहेत.

STAMPS AFFIXED HERE :

तसेच, सदर भुखंडाचा पक्ष क्र. २ व त्यांचे सर्व ईस्टेट वारसदार यांनी यापुर्वी पक्ष क्र. १ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणासोबत ही कुठल्याही प्रकारचा लेखी अथवा मौखिक करार केलेला नाही किंवा या मालमत्तेवर कोणतेही बँक, वित्तीय संस्था, सेठ-सावकार यांचा कर्ज-बोझा, गहाण निर्माण केलेला नाही किंवा भविष्यात ही करणार नाही, अशी सुद्धा पक्ष क्र. २ हे सदर लेखान्वये पक्ष क्र. १ यांना लेखी हमी देत आहेत.

तसेच, सदर भुखंडाचे पक्ष क्र.२ यांनी यापुर्वी पक्ष क्र. १ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणालाही विक्री, हस्तांतरण (ट्रान्सफर) वगैरे केलेले नाही व कोणास लेखी किंवा तोंडी करार, सौदा, वगैरे केलेला नाही. सदर मालमत्तेवर कोणतेही गोत्रपुरुष वारसानांचा हक्क संबंध नाही. तसेच, कोणत्याही संस्थेचा अथवा बँकेचा व इतर कुणाचाही कर्ज बोझा नाही, असे काही निघाल्यास किंवा कोणी दावे, उजर पेश केल्यास त्याचे निकाल लावुन पक्ष क्र. १ यांना झालेल्या नुकसानीची भरपाई पक्ष क्र. २ हे आपल्या इतर चल-अचल सम्पत्तीतुन प्रथम करुन देतील, पक्ष क्र.१ यांना तोशीश खर्च लागु देणार नाही.

सदर भुखंडाचे मुळ/नकल दस्तावेज पक्ष क्र. २ यांनी पक्ष क्र. १ यांना आज रोजी हस्तांतरीत केले असुन सदर भुखंडाचे सीमांकन करुन ताबा/कब्जा हा सुद्धा पक्ष क्र. २ यांनी पक्ष क्र. १ यांना यापुर्वीच संपुर्ण मोबदला रक्कम प्राप्त झाल्यानंतर लगेच कायम स्वरुपी दिलेला आहे. तसेच, सदर्हू मालमत्तेचे मुळ/नकल दस्तावेज व ताबा/कब्जा पक्ष क्र.१ यांनी यापुर्वीच स्विकारलेले आहे व आजनंतर सदर भुखंडाचा कायम स्वरुपी कब्जा/ताबा हा पक्ष क्र. १ यांचा असून भविष्यात सदर भुखंडाचा कब्जा/ताबा कायम ठेवण्याची संपुर्ण जवाबदारी ही पक्ष क्र. १ यांची आहे व राहील.

आता पक्ष क्र.१ यांनी आपले नाव या विकत घेतलेल्या सदर भुखंडाचे कायदेशीर मालक म्हणुन नागपूर महानगर पालिका, नागपूर सुधार प्रन्यास, नगर भुमापन अधिकारी कार्यालय (सिटी सर्व्हे), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, ग्रामपंचायत कार्यालय, तहसिल कार्यालय, नगर परिषद / पंचायत, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जल विभाग व आदि आवश्यक त्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात नोंदवुन घ्यावे व त्या कामी पक्ष क्र. २ हे

STAMPS AFFIXED HERE :

पक्ष क्र. १ यांना संपुर्ण सहकार्य करतील. आता पक्ष क्र. १ यांनी आपल्या इच्छेनुसार त्यांना विक्री करुन दिलेल्या भुखंडाचा उपभोग व फायदा घ्यावा व विल्हेवाट करावी. आता पक्ष क्र. २ किंवा त्यांचे इतर वारसानांचा या पक्ष क्र. १ यांना विक्री करुन दिलेल्या भुखंडाशी काहीही संबंध राहिलेला नाही.

तसेच, पक्ष क्र. १ यांना यापुढे या सदर भुखंडाचे मालकी, वापरी, वहिवाट किंवा इतर बाबीसंबंधी हक्क प्राप्त होण्याकरीता पक्ष क्र. २ यांच्या एखादे लेखाची आवश्यकता भासली तर ते पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांच्या खर्चाने लिहुन देतील व आवश्यकतेनुसार पंजीकृत (रजिस्टर्ड) करुन देतील, कोणत्याही प्रकारचा उजर पेश करणार नाही.

सदर भुखंडाबाबत कुठल्याही न्यायालयात, कुठल्याही कायद्या अंतर्गत अथवा मालकी हक्का संबंधी कुठलेही प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही किंवा कुठल्याही न्यायालयाचा सदर भुखंड विकणे संबंधी स्थगनादेश नाही. असे काही आढळल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी ही पक्ष क्र. २ यांची राहील.

सदर भुखंडासंबंधी कुठल्याही प्रकारची क्षेत्र दुरुस्ती (कमी/जास्त) व आकारवाढ झाल्यास त्यावर सुद्धा पक्ष क्र. २ यांचा भविष्यात कुठल्याही प्रकारचा कोणताही हक्क, अधिकार, सदर लेखान्वये राहणार नाही.

तसेच, या विक्रीपत्रात काही त्रुटी (चुका) आढळल्यास त्याचे दुरुस्ती पत्र करण्यास पक्ष क्र.२ हे सर्वतोपरी मदत करतील, टाळाटाळ करणार नाही. जर काही कारणास्तव पक्ष क्र.२ उपलब्ध नसल्यास पक्ष क्र. १ हे एकतर्फी दुरुस्ती पत्र/घोषणा पत्र करण्यास मोकळे राहतील, त्यास पक्ष क्र. १ यांची काहीही हरकत राहणार नाही.

तसेच, 'महालक्ष्मी नगर' या प्रकल्पाबाबत पक्ष क्र. २ यांनी प्राप्त केलेले आदेश व इतर जसे- ७/१२ उतारा, अभिन्यास नकाशा, गैरकृषी आदेश व इतर सर्व सदर भुखंडाचे विक्रीपत्र पंजीबद्ध करण्याकरिता लागणारे आवश्यक दस्तावेज सदर विक्रीपत्रासोबत संलग्नित करण्यात आलेले आहे.

तसेच, भविष्यात सदर भुखंडाच्या मालकी हक्काबाबत, कब्जा/ ताब्याबाबत, मोबदला रकमेबाबत, सदर विक्रीपत्राबाबत व इतर बाबत कुठल्याही प्रकारचा पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ यांच्या मध्ये वाद-विवाद, भांडण-तंटा, आक्षेप-तक्रार व इतर उद्भवल्यास ते मा. दिवाणी / फौजदार न्यायालय, नागपूर यांच्या मार्फत सोडविल्या जाईल.

STAMPS AFFIXED HERE :

सदर भुखंड हा पक्ष क्र. २ यांनी पक्ष क्र. १ यांना एकुण मोबदला रक्कम ₹ **८,९०,०००/- (अक्षरी रुपये आठ लक्ष नव्वद हजार फक्त)** मध्ये नेहमी व वंशपरंपरेकरीता विकला असून विक्रीची संपुर्ण मोबदला रक्कम पक्ष क्र. २ यांना पक्ष क्र. १ यांचेकडून खालील प्रमाणे प्राप्त झाले ती येणेप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| रु. | १,४०,०००/- | (अक्षरी रुपये एक लक्ष चाळीस हजार फक्त) दिनांक १२/०६/२०२६ रोजी पक्ष क्र. १ यांचेकडून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा - हिंगणा, नागपूर चे धनादेश क्र. १४७२२४ द्वारे पक्ष क्र. २ यांना मिळाले असून ते पक्ष क्र. २ यांना कबुल व मंजूर आहे. |
| ₹ | ७,५०,०००/- | (अक्षरी रुपये सात लक्ष पन्नास हजार फक्त) आज रोजी सदर विक्रीपत्र पंजीबद्ध करतेवेळी पक्ष क्र. १ यांचेकडून .................... बँक, शाखा - .................... चा धनादेश / धनाकर्ष क्र. ..............., दिनांक .................... रोजीचा पक्ष क्र. २ यांच्या नावाचा पक्ष क्र. १ यांनी .................... बँक, शाखा - .................... यांचेकडून घेतलेल्या गृहकर्ज खात्याचा मिळाला असून ते पक्ष क्र. २ यांना कबुल व मंजूर आहे. |
| ₹ | **८,९०,०००/-** | **(अक्षरी रुपये आठ लक्ष नव्वद हजार फक्त) असे एकुण.** |

आता सदर भुखंडाच्या मोबदला रकमेपैकी पक्ष क्र. २ यांना पक्ष क्र. १ यांचेकडून काहीही घेणे बाकी राहिले नाही. सदर भुखंड हा ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत पक्ष क्र. २ यांनी पक्ष क्र. १ यांना विकला असून पक्ष क्र. १ यांनी पक्ष क्र. २ यांचेकडून ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत खरेदी केला आहे.

## स्थावर मालमत्तेचे वर्णन

### (परिशिष्ठ क्र. १)

खास **मौजा - वानाडोंगरी**, प.ह.क्र. ४६, नगर परिषद - वानाडोंगरी, तह. हिंगणा, जि. नागपूर येथील अकृषक **खसरा क्र. १६ व १८**, ज्याची आराजी ०.२८ हे.आर. + १.४२ हे.आर. = **एकत्रित व संयुक्त आराजी १.७० हे.आर.** हिस्सापुर्ण.

STAMPS AFFIXED HERE :

**यासह भुमापन क्र. १६ व १८ ची संयुक्त चर्तु:सिमा येणेप्रमाणे :-**

पुर्वेस : नाला
पश्चिमेस : पांधन / रोड व भुमापन क्र. १७, २६/१, २६/२
उत्तरेस : रोड
दक्षिणेस : भुमापन क्र. १९

## सदर विक्रीपत्रान्वये पक्ष क्र. २ यांनी पक्ष क्र. १ यांना विकलेल्या भुखंडाचे वर्णन

## (परिशिष्ठ क्र. २)

खास **मौजा - वानाडोंगरी**, प.ह.क्र. ४६, नगर परिषद - वानाडोंगरी, तह. हिंगणा, जि. नागपूर येथील अकृषक **खसरा क्र. १६ व १८** मध्ये पक्ष क्र. २ यांनी 'महालक्ष्मी नगर' या नावाने आखलेल्या अभिन्यासातील **भुखंड क्र. २३,** ज्याची लांबी उत्तर-दक्षिण १२.५० मी. व रुंदी पुर्व-पश्चिम ४.०३ मी. असून असे या भुखंडाचे एकुण खुल्या जागेचे **क्षेत्रफळ ५०.३७ चौ.मी.** आहे. याचा स्वतंत्र भुमापन क्रमांक व उपविभाग १६/१८/२३ हा आहे.

**यासह या भुखंडाची चर्तु:सिमा येणेप्रमाणे :-**

पुर्वेस : भुखंड क्र. २२
पश्चिमेस : भुखंड क्र. २४
उत्तरेस : भुखंड क्र. १२
दक्षिणेस : ९.०० मी. रुंदीचा अभिन्यास रोड
हिस्सापूर्ण.

तसेच, सदर भुखंडाचे सदर्हू विक्रीपत्र पंजीबद्ध करण्याकरीता येणारे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ही **पक्ष क्र. १** यांनी स्वखर्चाने पटविलेली आहे.

येणेप्रमाणे सदर भुखंडाचे विक्रीपत्र पक्ष क्र. १ व २ यांनी अक्षरशः पुर्णतः वाचुन, समजून व समजावुन घेऊन कुणाच्या कुठल्याही प्रकारच्या दबावाला बळी न पडता, कुठलीही नशापाणी न करता, आपल्या पुर्ण शुद्ध व उत्तम मानसिक स्थितीत यावर खालील साक्षदारांसमोर हिंगणा / नागपूर येथे

STAMPS AFFIXED HERE :

स्वाक्षरी व अंगठा केला असून सदर विक्रीपत्र हे पक्ष क्र. १, २ व त्यांचे इतर इस्टेट वारसदार यांना कायमचे लागू व बंधनकारक असे व राहील.

We, Pavan G. Dhimole & Sarang D. Nighot Adv., R/o. Nagpur (Cell No. 9373216597 & 9422829960) do hereby states that this DEED OF SALE is drafted by us as per the instructions and documents provided by the parties hereto.

**लिहून घेणार (पक्ष क्र. १)**

**(श्री. हरिलाल पन्नालाल शर्मा)**

यांचा डावा हाताचा अंगठा

पासपोर्ट साईज फोटो

**लिहून देणार (पक्ष क्र. २)**

**(श्री. समिर श्यामराव कडव)**

यांचा डावा हाताचा अंगठा

पासपोर्ट साईज फोटो

**साक्षदार :**

पासपोर्ट साईज फोटो

१) ____________________

नाव :

वय अं. ..... वर्ष, व्यवसाय – ............

राह. :

(आधार क्र. ................................)

यांचा डाव्या हाताचा अंगठा

पासपोर्ट साईज फोटो

२) ____________________

नाव : श्री. सारंग ज्ञानेश्वर निघोट

वय अं. ४९ वर्षे, व्यवसाय – अधिवक्ता

राह. : २४, करिम लेआऊट,

गोपाल नगर, नागपूर – ४४० ०२२.

(आधार क्र. ३३११ ४१३७ ५०१४)

यांचा डाव्या हाताचा अंगठा

STAMPS AFFIXED HERE :

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 11 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

Win2PDF Overview: https://www.win2pdf.com/video/overview/

Purchase Win2PDF: https://www.win2pdf.com/purchase/